# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- १३६-२२** **दिनांक :- ११/०५/२०२२**

## फिल्म इंडस्ट्रीमधील शॅार्ट फिल्ममध्ये काम देण्याचे आमिष दाखवून २ अल्पवयीन मुलींवर जबरी /अनैर्गिक संभोग करून त्यांचेकडून खंडणी उकळणाऱ्या नराधमास अवघ्या २४ तासांत अटक-मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

नालासोपारा पोलीस स्टेशन येथे दिनांक ०९/०५/२०२२ रोजी पिडित मुलगी वय १३ वर्षे हिने फिर्याद दिली की, यातील आरोपीत याने डिसेंबर २०२१ मध्ये फेसबुक या सोशल मिडीयाव्दारे फिर्यादीशी संर्पक साधला. फेसबुकवर चॅट करीत असतांना आरोपीने फिर्यादीस तो फिल्म इंडस्ट्रीमध्ये प्रोडयुसर असून नवनवीन मुलामुलींचे फोटो शुट व पोर्टफोलियो तयार करुन फिल्म इंडस्ट्रीमध्ये शॅार्ट फिल्ममध्ये काम देतो असे सांगुन तुम्हाला व तुमच्या मैत्रणींनाही काम देतो असू सांगुन पोर्टफोलियोसाठी फोटो पाठविण्यास सांगितले. त्यानुसार पिडित मुलीने फोटो पाठविले असता त्यानंतर आरोपीने शॅार्ट फिल्मसाठी एकांत ठिकाणी भेटण्याचा तगादा लावला त्यानुसार पिडित अल्पवयीन मुली या आरोपीस त्याचे सांगणेनुसार एका ठिकाणी जाऊन भेटले असता आरोपीने पिडितांना त्यांचे फोटोचा गैरवापर करुन सोशलमिडियावर प्रसारित करेन अश्ी धमकी देऊन त्यांचे ईच्छेविरुध्द सदर ठिकाणी जबरदस्तीने अनैसर्गिक व नैसर्गिक संभोग केला. तसेच त्यांचे सोबत संभोग करीत असताना त्याचे व्हिडीओ चित्रीकरण करुन सदरचे चित्रीकरण सोशलमिडीया प्लॅटफार्मवर व्हायरल करण्याची धमकी देवुन फिर्यादी कडुन ७०,०००/- रुपये खंडणी स्वरुपात स्विकारले म्हणून नालासोपारा पोलीस ठाणे येथे भा.द.वि.सं. कलम ३७६, ३७७, ३८४, ५०६ सह बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४, ८, १२ प्रमाणे गुन्हा दाखल होता.

---

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर बाबत वरीष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे एक पथक सपोनि/दत्तात्रय सरक, पोना/संग्राम गायकवाड, पोअं/सुशिल पवार असे तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. सदर ठिकाणी आरोपी बाबत अधिक माहिती घेऊन त्याचे सोशल मिडिया अकाउंटचे तांत्रिक विश्लेषन करुन आरोपीबाबत माहिती प्राप्त करुन नवीमुंबई येथे जाऊन आरोपीचा शोध घेऊन आरोपी नामे लॅारेन्स प्रिडन लुईस ता. पनवेल जि. नवी मुंबई यास ताब्यात घेऊन त्याचेकडे गुन्हयासंदर्भात सखोल विचारपूस केली असता, सदरचा गुन्हा हा त्यानेच केल्याचे निष्पन्न करुन गुन्हा दाखल झाल्यापासून अवघ्या २४ तासात गंभीर गुन्हयाची उकल करण्यात

यश संपादन केले असून आरोपीस पुढील कारवाई कामी नालासोपारा पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे. सदर आरोपी विरुध्द न्हावाशेवा पोलीस ठाण् येथे गु.रजि.नं. ८२/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३५४ (अ), ३२३, ५०९, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई डॉ. महेश पाटील, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो. नि. राहुल राख, सपोनि/दत्तात्रय सरक, पोना/०७०६२ राजाराम काळे, पोना/०४००९ संग्राम गायकवाड, पोअं./३५७९ सुशील पवार यांनी केलेली आहे.

----ooo----